05-07-2024-Dai-05_DH_PAN_20_08_2016-3.qxp 7/4/2024 10:11 PM Page 1



## निवडक

### रुद्रतेज संस्थेतर्फे ७ रोजी गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव

■ टीम दैनिक हेराल्ड

**फोंडा, दि. ४ :** पणजी येथील दि भंडारी सहकारी क्रेडीट सोसायटी लि.च्या रुद्रतेज संस्थेच्या वतीने संस्थेचे कर्मचारी, संचालक, सभासद व भागधारकांच्या गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव समारंभ दि. ७ जुलै रोजी सकाळी १०.३० वा. सहकारभवन, पाटो-पणजी येथे संपन्न होणार आहे. या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून कृषिमंत्री रवी नाईक, प्रमुख अतिथी म्हणून केंद्रीय ऊर्जामंत्री श्रीपाद नाईक, खास अतिथी म्हणून आमदार विरेश बोरकर, अरविंद बुगडे व रामाराव वाघ प्रमुख वक्ते म्हणून उपस्थित राहणार आहेत. यावेळी संस्थेकडून केंद्रीय ऊर्जामंत्री श्रीपाद नाईक यांना प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते सतत सहाव्यांदा निवडून आल्याबद्दल सन्मानित करण्यात येणार आहे. गुणवंत विद्यार्थांनी आपल्या पालकांसह तसेच संस्थेचे सभासद व भागधारकानी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे, असे कर्मचारी व संचालक मंडळाच्या वतीने संस्थेचे अध्यक्ष गुरुनाथ नाईक यांनी कळविले आहे.

### आगरवाडा सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाची रविवारी सभा

■ टीम दैनिक हेराल्ड

**पेडणे, दि. ४ :** आगरवाडा सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाची वार्षिक सर्वसाधारण सभा रविवार दि. १४ जुलै रोजी सकाळी १० वा. गणेशोत्सव मंडळाच्या सभागृहात आयोजित करण्यात आली आहे. महिला समितीची वार्षिक सभा रविवार दि. १४ रोजी सायंकाळी ४ वा. त्याच ठिकाणी घेण्यात येईल. या सभेत मागील सभांचे इतिवृत्त वाचून कायम करण्यात येईल. सन २०२३-२४ या वर्षाच्या जमाखर्चावर चर्चा करून मान्यता घेण्यात येईल. त्यानंतर मंडळाची नवीन कार्यकारिणी निवडण्यात येईल. अध्यक्षांच्या परवानगीने ऐन वेळी आलेल्या विषयावर चर्चा करून निर्णय घेण्यात येईल. कोरमअभावी तहकूब झालेली सभा अर्ध्या तासाने त्याच ठिकाणी घेण्यात येईल. मंडळाच्या सभासदांनी वेळेवर उपस्थित राहून सहकार्य करावे, असे आवाहन आगरवाडा सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाचे अध्यक्ष महेश परब व सचिव सखाराम नागवेकर यांनी केले आहे.

### प्रज्ञाशोध परीक्षेत दक्ष देसाई, स्वरा गावकर यांचे यश

■ टीम दैनिक हेराल्ड

**दाभाळ, दि. ३ :** राज्य प्रोत्साहन शिष्यवृत्ती प्रज्ञाशोध परीक्षेत सावरगाळ, किर्लपाल येथील सोमनाथ मराठी प्रथमिक शाळेचा दक्ष सावंत देसाई व स्वरा गावकर या विद्यार्थ्यांनी यश संपादन करून शिष्यवृत्ती प्राप्त केली. दक्ष सावंत देसाई याने ८४ टक्के गुण मिळविले, तर स्वरा गावकर हिने ८२ टक्के गुण प्राप्त केले. त्यांच्या या यशाबद्दल पालक शिक्षक संघ, शालेय व्यवस्थापन समिती, सोमनाथ माध्यमिक हायस्कूलच्या मुख्याध्यापिका प्रज्वला बखले यांनी अभिनंदन केले आहे. दक्ष व स्वराला प्रिया राऊळ, विजया हुमाणे व गोविंद गावकर या शिक्षकांचे मार्गदर्शन लाभले.

### श्री विठ्ठल रखुमाई शाळेच्या विद्यार्थ्यांचे प्रज्ञा शोध परीक्षेत यश



डिचोली : श्री विठ्ठल रखुमाई सरकारी प्राथमिक शाळेचे प्रज्ञाशोध परीक्षेत अव्वल आलेले विद्यार्थी शिक्षकांसमवेत. (विशांत वझे)

■ टीम दैनिक हेराल्ड

**डिचोली, दि. ४ :** राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेतर्फे सन २०२४ मध्ये घेण्यात आलेल्या प्रज्ञा शोध परीक्षेत डिचोलीतील विठ्ठल रखुमाई सरकारी प्राथमिक विद्यालय, विठ्ठलपूर या शाळेतील मयूर गावस याने ८९ टक्के गुण मिळवून तालुक्यात प्रथम क्रमांक पटकावला.तपस्या मापारी हिने दुसरा व आरुष गावडे याने ८३ टक्के मिळवून मागासवर्गीय विभागात डिचोली तालुक्यात प्रथम क्रमांक पटकावला .श्लोक नाईक ८६ टक्के, अवनी पाटील ८६ टक्के, शिवानी मराठे ८१ टक्के,वेदांत सामंत ८० टक्के मिळवून उत्तीर्ण झाले. या शाळेतील १९ विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट गुण मिळविले. वर्गशिक्षिका कविता धावस्कर,दिव्या सावंत, शिल्पा सावंत यांचे या मुलांना मार्गदर्शन लाभले. मुख्याध्यापिका छाया बोकाडे, पालक-शिक्षक संघ शाळा व्यवस्थापन समिती तसेच स्थानिकांनी सर्व विद्यार्थ्यांचे आणि शिक्षकांचे अभिनंदन केले आहे.

### सम्राट क्लब केरीतर्फे होंडा येथे मार्गदर्शन



होंडा : नारायणनगर येथील 'अष्टांग योग आणि निरामय जीवन' मार्गदर्शन सत्रात सहभागी झालेल्या महिलांसमवेतत संजय गावकर,भैरू झोरे व प्रमोद सावंत. (राघोबा पेडणेकर)

■ टीम दैनिक हेराल्ड

**साखळी, दि. ४ :** सम्राट क्लब, केरीतर्फे नारायणनगर-होंडा येथे महिला स्वयंसहायता बचत गटासाठी 'अष्टांग योग आणि निरामय जीवन' या विषयावर मार्गदर्शन सत्र संपन्न झाले. सरकारी माध्यमिक विद्यालय, केरी-सत्तरीचे शिक्षक संजय गावकर यांनी मार्गदर्शन केले. या कार्यक्रमात सम्राट क्लबचे पदाधिकारी उपस्थित होते. महिला गटाच्या अध्यक्षा धनश्री शिरोडकर उद्घाटनप्रसंगी मान्यवर म्हणून उपस्थित होत्या. सम्राट क्लबचे अध्यक्ष भैरो झोरे यांनी उपस्थितांचे स्वागत करून कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. यावेळी विविध आसने व प्राणायाम शिकविण्यात आले.

### अस्नोडा वारकरी मंडळाचे पंढरपूरला प्रयाण

■ टीम दैनिक हेराल्ड

म्हापसा, दि. ४ : अस्नोडा येथील श्री भक्त पुंडलिक वारकरी मंडळाच्या शंभरहून अधिक वारकऱ्यांनी काल पंढरपूरच्या दिशेने प्रस्थान केले.अस्नोडा येथील श्री शांतादुर्गा मंदिराच्या प्रांगणात समाजसेवक आपा विश्राम शेट तानावडे यांच्या हस्ते यावेळी श्रीफळ वाढवण्यात आले.यावेळी माजी गोवा राज्य शिवसेना प्रमुख संजय हरमलकर व अस्नोड्याच्या माजी सरपंच सपना मापारी या ही उपस्थित होत्या.या तिघांनी भगवा झेंडा दाखवून अस्नोड्याच्या वारकऱ्यांच्या वारीला निरोप दिला. या वारीचे नेतृत्व पद्माकर वायंगणकर,उमेश गावस सुरज चोडणकर, अन्वय बागकर, शैलेश कुडणेकर, रसिक पर्रीकर हे करत आहेत.सदर पंधरा दिवसीय वारीला वाटेत लागणारी सर्वतोपरी मदत आपा शेट तानावडे यांनी केली आहे.या वारकऱ्यांना निरोप देण्यासाठी अस्नोडा पंचक्रोशीतील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.



अस्नोड्याहून पंढरपूरला निघालेल्या श्री भक्त पुंडलिक वारकरी मंडळाला भगवा झेंडा दाखवून निरोप देताना आपा शेट तानावडे, संजय हरमलकर व अन्य.

# मुलांच्या प्रगतीसाठी पालकांचे सहकार्य आवश्यक

▸ प्राचार्य फर्नांडिस

▸ दहावीतील गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव




वाळपई : अवर लेडी हायस्कूलच्या गुणवंत विद्यार्थ्यांच्या सत्कार समारंभात उपस्थित फादर रॉबर्ट फर्नांडिस. सोबत विद्यालयाचे शिक्षक व गुणवंत विद्यार्थी.

■ टीम दैनिक हेराल्ड

वाळपई, दि. ४ : मुलाने आपले ध्येय निश्चित करावे. ध्येयप्राप्तीसाठी आवश्यक असलेल्या गोष्टींचा पर्याय निवडावा. प्रत्येक संधीचा फायदा घ्यावा. यासाठी पालकांचे मुलांना सहकार्य असणे अत्यंत गरजेचे आहे, कारण पालक हे प्रोत्साहनाचे व्यासपीठ असते, असे प्रतिपादन अवर लेडी ऑफ लूड्स हायस्कूल, वाळपईचे प्राचार्य फादर रॉबर्ट फर्नांडिस यांनी केले.

दहावीतील गुणवंत विद्यार्थ्यांच्या गौरव समारंभात ते बोलत होते. अवर लेडी ऑफ लुर्डस हायस्कूलमध्ये दहावी उत्तीर्ण गुणवंत मुलांचा पालक-शिक्षक संघातर्फे गौरव करण्यात आला. या कार्यक्रमात शाळेचे व्यवस्थापक फादर सांताना गामा यांनी मुलांचे कौतुक केले. देशाचे चांगले नागरिक होण्याचे आवाहन त्यांनी केले.

यावेळी शालांत मंडळाच्या परीक्षेत ८० टक्क्यांहून जास्त गुण मिळविलेल्या शाळेतील सतरा विद्यार्थ्यांचे कौतुक करण्यात आले. या विद्यार्थ्यांमध्ये वैभव गावकर ,सानिका गावस ,रुणाली गावडे, अनुष्का गावकर ,साक्षी शिरोडकर, सोहम वझे ,मोहम्मद मटाफ, कशीश पर्येकर, उज्झेर खान, लक्ष्मण गावस, तीर्थ गावस ,क्रिस्लीन नरोन्हा,जमिला शाह, प्रांजली दामले, कार्तिक गणपुले, श्रेया सावंत व महिरा खान या गुणवंत विद्यार्थ्यांचा कौतुक सोहळा करण्यात आला.

या सोहळ्यादरम्यान मुख्याध्यापक फादर रॉबर्ट फर्नांडिस यांनी उपस्थित पालकांना राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाबद्दल माहिती दिली . शिक्षिका दर्शना देसाई यांनी पालकांनी आपल्या पाल्यांची कोणती व कशी काळजी घ्यावी, यावर भाष्य केले. शिक्षिका मारीयेता फर्नांडिस व क्रिस्तबेल लोबो यांनी पालक-शिक्षक संघाचा वार्षिक अहवाल सादर केला. कार्यक्रमाची सुरुवात ईशस्तवनाने करण्यात आली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शिक्षिका प्रांजली गावस व स्नेहा नाईक यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी पालक-शिक्षक संघाच्या कार्यकारी मंडळींनी हातभार लावला.

# सावंतवाडा उपआरोग्य केंद्र नूतनीकरणाचे आश्वासन



मांद्रे : येथे उप-आरोग्य केंद्राची पाहणी केल्यानंतर सरपंच प्रशांत नाईक व आदी. (मकबूल माळगीमनी)

■ टीम दैनिक हेराल्ड

**कोरगाव, दि. ४ :** सावंतवाडा येथील मांद्रे पंचायतीची इमारत उपआरोग्य केंद्रासाठी भाडेतत्वावर दिली होती. उपआरोग्य केंद्रातील कर्मचारी मागील दोन वर्षांपासून या इमारतीच्या नूतनीकरणाची मागणी करीत असून अजूनही कोणतीच कार्यवाही होत नसल्याने त्यांनी सरपंच प्रशांत नाईक यांच्याकडे मागणी केली. त्यावेळी त्यांनी लवकरच नूतनीकरण करण्याचे आश्वासन दिले.

मांद्रे पंचायतीने उप-आरोग्य केंद्राचे नूतनीकरण करण्यासाठी पंचायतीच्या बैठकीत ठराव संमत केला आहे. सरपंच नाईक यांच्याशी संपर्क साधला असता त्यांनी सांगितले की, प्रत्यक्ष पाहणी करायला गेलो असता इमारतीची परिस्थिती बिकट दिसून आली. या इमारतीत दररोज दीडशेहून अधिक लोकांची ये-जा असते. येथे कर्मचारी देखील कार्यरत असतात.

येथील कर्मचाऱ्यांनी सांगितले की, येथे भयानक अवस्था आहे. यासंबंधी पंच, माजी सरपंच यांना कळविले होते. आम्हाला या इमारतीत काम करण्याची भीती वाटत आहे. त्यानंतर आता आम्ही विद्यमान सरपंच प्रशांत नाईक यांची भेट घेऊन त्यांच्याकडे आमचे गाऱ्हाणे मांडले असता त्यांनी लगेच याची दखल घेऊन इमारतीची पाहणी देखील केली आहे. या इमारतीत वाचनालय आणि उपआरोग्य केंद्र सुरू आहे.

इमारतीच्या छप्परवरील सिमेंट खाली कोसळत आहे. शौचालय बांधकामावरील पाण्याची टाकी उघडीच आहे. येथील सेप्टिक टॅकही उघडाच असून यामुळे रोगराई पसरण्याची दाट शक्यता आहे. प्रत्यक्ष पाहणीवेळी सरपंच प्रशांत नाईक यांनी सांगितले की, ही इमारत पंचायतीची असून गेल्या अनेक दिवसांपासून इमारत दुरूस्त करण्याची कर्मचाऱ्यांची मागणी होती. लोकांच्या आरोग्याची काळजी हे कर्मचारी घेत असून त्यांची सुरक्षा आम्ही जपली पाहिजे. ही आवश्यकता ओळखून मी लवकरच इमारत दुरूस्त करण्याचे आश्वासन दिले. केवळ आश्वासन देऊन न थांबता त्यासाठी पंचायत बैठकीत ठराव देखील घेतला आहे. प्रत्यक्ष पाहणीवेळी उपसरपंच तारा हडफडकर, पंच सदस्य चेतना पेडणेकर, संपदा आसगावकर उपस्थित होत्या.



म्हापसा : हळदोणा येथे सुरू असलेले संगीत संमेलन. (भारत बेतकेकर)

### साळ-पणजी 'कदंब' बस अनियमित

टीम दैनिक हेराल्ड

**साळ, दि. ४ :** येथील दि. ४ रोजी साळ ते पणजी कदंब बस अनियमित मंगळवार पासून बैर्कडाऊनच्या निर्णयाने अजूनही बस साळ प्रवासकरित्यासाठी परतली नाही, त्यामुळे साळ,दोडामार्ग प्रवाशाची गैरसोय झाली.

# सम्राट क्लब हळदोणाची संगीत सभा उत्साहात

■ टीम दैनिक हेराल्ड

**म्हापसा, दि. ४ :** सम्राट क्लब, हळदोणा आणि स्वरगंधार कला केंद्र, नास्नोडा यांच्या संयुक्त विद्यमाने नुकतीच रवळघाडी ग्रामस्थ पंचायतन देवस्थान सभागृहात 'स्वर तरंग... एक परंपरा' संगीत सभा मोठ्या उत्साहाने पार पडली. सुरुवातीस पाहुण्यांचे स्वागत करण्यात आले. दीपप्रज्वलनाने मुख्य कार्यक्रमाची सुरुवात झाली.

सर्व प्रार्थना 'स्वरगंधार'च्या विद्यार्थ्यांचे स्वागतगीत, भारतनाट्यम, एकल तबला वादन, एकल हार्मोनियम वादन व नाट्यगीत सादर झाले.

गायक राजेश बोरकर आणि त्यांच्या कन्या शांभवी आणि स्वरा यांनी उत्कृष्ट भक्तीगीते सादर केली.

या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून उत्कृष्ट सतार वादक लक्ष्मीकांत खांडेकर, आमंत्रित पाहुणे समाज कार्यकर्ते महेश साटेलकर, तसेच सम्राट क्लब इंटरनॅशनल स्टेट-१ चे संगीत सभा कार्यक्रम अधिकारी शिरीष लवंदे हजर होते. प्रास्ताविक सम्राट क्लबचे अध्यक्ष रमाकांत अणवेकरांनी तर गोपिकांत शिरोडकरांनी आभार मानले.

सूत्रसंचालन सम्राट सिध्दी रायकर यांनी केले. कार्यक्रम अधिकारी म्हणून सम्राट अमित शिंदे यांनी काम पाहिले. पाहुण्यांच्या हस्ते सर्व कलाकारांना भेटवस्तू आणि प्रशस्तीपत्रे देण्यात आली. या कार्यक्रमाचा सम्राट क्लब आणि स्वरगंधारचे सभासद तसेच इतर संगीत प्रेमींनी लाभ घेतला.


**OFFICE OF THE CIVIL REGISTRAR CUM SUB REGISTRAR AND SPECIAL NOTARY (EX-OFFICIO) OF BARDEZ JUDICIAL DIVISION AT MAPUSA, GOA**

**NO. CRSR / BARDEZ / NOT / 938 / 2024 Dated 25/06/2024**

**NOTICE**

Ms. Firdous Saba Bepari, Joint Civil Registrar cum Sub Registrar II and Special Notary Ex-Officio of Bardez Judicial Division at Mapusa, Goa

In accordance with Sec. 346 (11) of the Goa Succession Special Notaries and Inventory Proceeding Act, 2012, it is hereby made public that by a Notarial Deed of Succession dated 07/06/2024 drawn by and before me Ms. Firdous Saba Bepari, Joint Civil Registrar Cum Sub Registrar II and Special Notary Ex-Officio Bardez at Mapusa at Page 71 onwards in the Notarial Book No. 886 of this Office the following is recorded:

That on 15.08.2021, expired Vithal Bhicu Shirodkar alias Vital Bicu Sirodcar at Goa Medical College, Bambolim, Goa and his first wife Veena Shirodkar alias Surangue Redcar predeceased him on 04.05.2003 at Nagoa and his second wife Mangal Vithal Shirodkar predeceased him on 29.07.2022 at Fuldem Vaddo, Nagoa, all three hailed from H.No. 93, Nagoa, Bardez, Goa, without Will, Gift or any other Testamentary disposition of their estate leaving behind them as their only legal heir namely (one) Viraj Vithal Shirodkar, son of late Vithal Bhicu Shirodkar alias Vital Bicu Sirodcar, age 33 years, service, married to Mrs. Seema Viraj Shirodkar, wife of Shri Viraj Vithal Shirodkar, age 32 years, housewife, both Indian National and residing at H.No. 93, Fuldem Vaddo, Nagoa, Bardez, Goa and (two) Miss. Vijayalata Vithal Shirodkar, daughter of late Vithal Bhicu Shirodkar alias Vital Bicu Sirodcar, spinster, expired on 27.07.1997. That besides the above mentioned legal heirs of the deceased persons Vithal Bhicu Shirodkar alias Vital Bicu Sirodcar, his first wife Veena Shirodkar alias Surangue Redcar and his second wife Mangal Vithal Shirodkar, there are no other person or persons who according to law may concur with them in the inheritance left by the deceased person.

Any person having objection to this deed may file in this Office within 30 days from the date of its publication.

Seal

Sd/-**Firdous Saba Bepari**
Special Notary (Ex-Officio)
Bardez, Mapusa, Goa

**BEFORE THE ASSTT. REGISTRAR OF CO-OPERATIVE SOCIETIES Govt. of Goa**

**C/o VPK URBAN CO-OPERATIVE CREDIT SOCIETY LTD.**

REGIONAL OFFICE: 1st Floor "Summit Classic" Bldg. Opp. - Municipal Garden, Ponda – Goa. P.H. 2313445

**ABN Case No.:- ARCS/VPK/HONDA/2023/ABN/1892**

VPK Urban Co-operative Credit Society Ltd. Honda Branch, Honda Sattari- Goa. ..Disputant

V/s

1.Mr.Tushar Anand Bhagat, H.No.191 Deulwada Marcel Goa. 2.Mr.Amit Balkrishna Toraskar Nr. Government College Khandola Marcel Goa. 3.Mr.Yogesh Dashrath Sawant, H.No.376 Reis Magos Ambekhar Verem Bardez Goa ….Opponents

**(Summons under Order V Rule 20 (1-A) of C.P.C. 1908)**

To, The Opponent No.1

WHEREAS, the above mentioned disputant society has instituted a dispute against you, Opponents for recovery of dues, in terms of section 83 of the Goa Co-operative Societies Act, 2001.

AND WHEREAS the disputant has claimed a sum of Rs.2909839.50 (Rupees Twenty Nine Lakhs Nine Thousand Eight Hundred Thirty Nine and paise Fifty Only) with accrued interest thereon and cost.

AND WHEREAS, the proceedings has been initiated into the same and the summons/notice issued to you at your last known address returned unserved with postal remarks " Unclaimed" returned to sender".

AND WHEREAS, the disputant vide application dated 03.07.2024 prayed to publish the notice on local newspaper as substitute service as required under Order V Rule 20 (1-A) of C.P.C. 1908.

AND WHEREAS the court is satisfied that this is fit case for ordering substitute service by publication of notice on local newspaper.

NOW THEREFORE, the above opponents hereby summoned by this notice to appear before me in person on 24.07.2024 at 3.00 P.M. and to produce on that day all the documents upon which they intend to rely in support of their defense.

TAKE NOTE that in default of your appearance on the date and the time as stipulated above, the matter will be heard and determined in your absence.

Given under my hand & seal of this office on this 3rd day of July 2024.

Place: **Ponda – Goa**

SEAL

**Sd/- (Harischandra S Gawde)**
ASSTT. REGISTRAR OF CO-OP. SOCIETIES, GOVT. OF GOA.

**BEFORE THE ASSTT. REGISTRAR OF CO-OPERATIVE SOCIETIES Govt. of Goa**

**C/o VPK URBAN CO-OPERATIVE CREDIT SOCIETY LTD.**

REGIONAL OFFICE: 1st Floor "Summit Classic" Bldg. Opp. - Municipal Garden, Ponda – Goa. P.H. 2313445

**ABN Case No.:- ARCS/VPK/HONDA/2024/ABN/2246**

VPK Urban Co-operative Credit Society Ltd. Honda Branch, Honda Sattari- Goa...Disputant

V/s

1.Mr.Rupesh Damodar Naik H.No.45 Sonshi Honda Sattari Goa 2.Mr.Rajan Haridas Korgaonkar H.No.35 Sonshi Honda Sattari Goa 3.Mr.Shamba Bhaskar Painaik H . N o 5 2 9 Chiknem Kudne Bicholim Goa.….Opponents

**(Summons under Order V Rule 20 (1-A) of C.P.C. 1908)**

To, The Opponent No.3

WHEREAS, the above mentioned disputant society has instituted a dispute against you, Opponents for recovery of dues, in terms of section 83 of the Goa Co-operative Societies Act, 2001.

AND WHEREAS the disputant has claimed a sum of Rs.366315.50 (Rupees Three lakhs Sixty Six Thousand Three Hundred Fifteen and paise Fifty Only) with accrued interest thereon and cost.

AND WHEREAS, the proceedings has been initiated into the same and the summons/notice issued to you at your last known address returned unserved with postal remarks **"Insufficient Address"** returned to sender".

AND WHEREAS, the disputant vide application dated 03.07.2024 prayed to publish the notice on local newspaper as substitute service as required under Order V Rule 20 (1-A) of C.P.C. 1908.

AND WHEREAS the court is satisfied that this is fit case for ordering substitute service by publication of notice on local newspaper.

NOW THEREFORE, the above opponents hereby summoned by this notice to appear before me in person on **24.07.2024 at 3.00 P.M.** and to produce on that day all the documents upon which they intend to rely in support of their defense.

TAKE NOTE that in default of your appearance on the date and the time as stipulated above, the matter will be heard and determined in your absence.

Given under my hand & seal of this office on this 3rd day of July'2024.

Place: **Ponda – Goa**

SEAL

**Sd/- (Harischandra S Gawde)**
ASSTT. REGISTRAR OF CO-OP. SOCIETIES, GOVT. OF GOA.

**PUBLIC NOTICE**

IT IS HEREBY informed that my clients **Shri. SURESH RAMA GADEKAR** and **Smt. NEETA SURESH GADEKAR**, both residents of House No. 540, Lima Waddo, Socorro, Porvorim, Bardez, Goa, 403501 and **Smt. RAJESHRI RAMKRISHNA MARDOLKAR**, and **Shri. RAMKRISHNA SURYAJI MARDOLKAR**, both residents of House No. 238, Savlem, Pilerne, Bardez, Goa 403114, are the lawful tenants in possession, cultivation and enjoyment of the property known as **"ARADI"** also known as **"PEDACHO SORVO"**, bearing **Survey No. 172, Sub-Division no. 1**, admeasuring 31075 square meters and the property known as **"ARADHI"** also known as **"PEDACHO SORVO"**, bearing **Survey No. 171, Sub-Division no. 1 (171/0)** admeasuring 32050 square meters, both situated in the Village Socorro, of Bardez Taluka, State of Goa.

On behalf of my clients, it is hereby informed that they do not wish to sell their share/tenancy rights in the said properties and cautioned to Individual, Person/s, Bank/s, Corporation/s, Legal Entity, any Financial Institution/s, Company, Firm (Partnership or Individual), not to deal and or enter into any agreement, lease, memorandum of understanding, sale deed, gift deed or any kind of conveyance etc., of any nature with respect to the aforesaid properties and anybody dealing with as aforesaid shall do so on their own consequences.

Sd/- **Adv. Parshuram S. Madval**
9, Le Brang Apartment,
Near Mapusa Clinic Hospital, Mapusa, Goa

**जाहीर सूचना**

याद्वारे सर्वांना नोटीस देण्यात येते की, माझे अशील **श्री. मंगेश परुळेकर** हे खालील टरकोइज सोल्यूशन्स एलएलपी, एक लिमिटेड लायेबिलिटी पार्टनरशीप फर्म यांचेद्वारा मालकी असलेली **अनुसूचित मालमत्ता** महाण टाकू इच्छितात सुरक्षित करू इच्छितात.

कोणीही व्यक्ती, संस्था, कंपनी, फर्म, भागीदारी, संस्था किंवा अन्य कोणतेही पक्ष यांना सदर **अनुसुचित व्हिला** किंवा त्याच्या कोणत्याही भागावर विक्री, अदलाबदल, भाडेपट्टा, धारणाधिकार (लायेन), गहाणवट, ट्रस्ट, चार्ज, वारसा, सह-मालकी, सुविधाधिकार (इजमेंट), बक्षिसी किंवा अन्य कोणत्याही व्यवहाराद्वारे कोणताही दावा असल्यास किंवा त्याविरुद्ध दावा असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्याच्या तराखेपासून **सात (७)** दिवसांच्या आत सर्व कागदोपत्री पुराव्यासह सत्यप्रतींसह येथे खाली दिलेल्या पत्त्यावर खाली सही करणाऱ्याकडे ते लेखी सादर करावे अन्यथा सदर प्रस्तावित विक्रीवर कोणाचाही कोणताही दावा किंवा हरकती नाहीत असे गृहित धरले जाईल आणि अशा कोणत्याही दाव्याचा संदर्भ न ठेवता किंवा तो जमेस न धरता सदर विक्री पूर्ण केली जाईल आणि तसे काही दावे असल्यास, तो सोडून दिले आहेत असे गृहित धरले जाईल व त्यानंतर ते माझे अशीलांवर बंधनकारक राहणार नाहीत.

**अनुसूची मालमत्ता**

खालील निकषांसह असलेल्या **१०००.०० चौ.मी. क्षेत्रफळाच्या जमिनीचा संपूर्ण प्लॉट** : पूर्वेस : २६ मी., पश्चिमेस : ३५.५५ मी., उत्तरेस : ३२.१८ मी. व दक्षिणेस : ३३.३४ मी. जी बार्देश तालुक्याच्या कळंगुट गावाच्या नायकावाडा प्रभागात आराडी या नावाने ओळखल्या जाणाऱ्या स्थावर मालमत्तेचा दक्षिणेकडील भाग असून खंड-९१ च्या क्र. ३५४१९ खाली बार्देशच्या भू नोंदणी कार्यालयात संपूर्णपणे वर्णिलेली आहे आणि कळंगुट बार्देश, गोवाच्या दुसऱ्या विभागाच्या क्र. १६२९, १६८२, १६३४, १६७९, १६६९ व १६३८ खाली भू महसूल कार्यालयात नोंदवलेली आहे व सदर संपूर्ण मालमत्ता कळंगुट गावाच्या सर्व्हे क्र. २६ पोटविभाग क्र. १ खाली सध्या सर्वेक्षित आहे आणि

**मालमत्तेच्या चतुःसीमा खालील प्रमाणे** :

**उत्तरेस** : सर्व्हे क्र. २६ /१ असलेल्या याच मालमत्तेचा भाग

**दक्षिणेस** : कोमुनिदाद जमीन व सर्व्हे क्र. २९

**पूर्वेस** : सेंट ॲलेक्स अनाथालयच्या मालकीची मालमत्ता, सर्व्हे क्र. २६ /२

**पश्चिमेस** : सेंट ॲलेक्स अनाथालयच्या मालकीची मालमत्ता, सर्व्हे क्र. २५ /४.

**दि. ०२.०७.२०२४**

**ॲड. सिद्धार्थ जे. सामंत**
ॲडव्होकेट्स व नोटरी
संपर्क क्र. ९४२२४३८९६०, ८७६७४२२९७६
५०३-५०४, ५वा मजला, एडकॉन माईंडस्पेस,
कांपाल ट्रेड सेंटरजवळ,
ताज विवांता समोर, कांपाल, पणजी, तिसवाडी, गोवा-४०३००१.
ईमेल : samantadvocates@yahoo.com

**जाहीर सूचना**

याद्वारे **श्री. श्याम हर्षवर्धन पटेल व श्रीमती जानकी श्याम पटेल** जे येथे खाली दिलेल्या **अनुसूचित मालमत्तेचे** मालक आहेत व ती त्यांच्या ताब्यात आहे आणि **सदर व्हिला** ते माझे अशील चोला मंडलम इनव्हेस्टमेंट ॲंड फायनान्स कंपनी लि. यांचेकडे गहाण टाकू इच्छितात.

ही नोटीस खासकरून दिली जात आहे कारण खालील कागदपत्रांची पूर्वीची मालिका गहाळ झाली आहे / हरवली आहे आणि सुरत पोलिस ठाणे, गुजरात येथे पोचपावतीसह पोलिस तक्रार दाखल केली आहे.

१) खंड-१ मध्ये बार्देश उपनिबंधक यांच्या कार्यालयात रीतसर नोंदणी केलेला विक्री करार दि. ०८.०४.२०१०, दस्तावेज नोंदणी क्र. बीआरझेड-बीके-१-०११५४-२०१०, सीडी क्र. बीआरझेडडी ५५ दि. ०९.०४.२०१० आणि

२) खंड-१ मध्ये बार्देश उपनिबंधक, म्हापसा यांच्या कार्यालयात रीतसर नोंदणी केलेला विक्री करार दि. १३.०६.२०१२, दस्तावेज नोंदणी क्र. बीआरझेड-बीके-१-०२४७८-२०१२, सीडी क्र. बीआरझेडडी ३३१ दि. १३.०६.२०१२.

कोणीही व्यक्ती, संस्था, कंपनी, फर्म, भागीदारी, संस्था किंवा अन्य कोणतेही पक्ष यांना सदर **अनुसुचित व्हिला** किंवा त्याच्या कोणत्याही भागावर विक्री, अदलाबदल, भाडेपट्टा, धारणाधिकार (लायेन), गहाणवट, ट्रस्ट, चार्ज, वारसा, सह-मालकी, सुविधाधिकार (इजमेंट), बक्षिसी किंवा अन्य कोणत्याही व्यवहाराद्वारे कोणताही दावा असल्यास किंवा त्याविरुद्ध दावा असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्याच्या तराखेपासून सत (७) दिवसांच्या आत सर्व कागदोपत्री पुराव्यासह सत्यप्रतींसह येथे खाली दिलेल्या पत्त्यावर खाली सही करणाऱ्याकडे ते लेखी सादर करावे अन्यथा सदर प्रस्तावित विक्रीवर कोणाचाही कोणताही दावा किंवा हरकती नाहीत असे गृहित धरले जाईल आणि अशा कोणत्याही दाव्याचा संदर्भ न ठेवता किंवा तो जमेस न धरता सदर विक्री पूर्ण केली जाईल आणि तसे काही दावे असल्यास, तो सोडून दिले आहेत असे गृहित धरले जाईल व त्यानंतर ते माझे अशीलांवर बंधनकारक राहणार नाहीत.

**अनुसूची**

गोवा राज्यातील उत्तर गोवा जिल्ह्यात बार्देश तालुका व उपजिल्ह्यातील हणजूण कायसूव पंचयातीच्या हणजूण ग्रामपंचायतीच्या हद्दीत हणजूण महसूल गावाच्या सर्व्हे क्र. २०३, पोट विभाग क्र. ४ खाली सर्वेक्षित आणि कांतिओ किंवा कांतीयाचे आराडी किंवा रांतिओ या नावाने ओळखल्या जाणाऱ्या सदर मालमत्तेत बांधलेल्या सदर व्हिला जमिनीच्या प्रमाणित हिश्श्यासह गोविया हॉलिडे होम्स या नावाच्या कॉम्प्लेक्समध्ये असलेल्या एकूण १०३.१५ चौ.मी. क्षेत्रफळाच्या ज्यात ८५.१५ चौ.मी. बिल्ट अप क्षेत्रफळ अधिक १८ चौ.मी. पोर्च क्षेत्रफळ असलेल्या (ग्रामपंचायत घर क्र. १७०४/३ए ) असलेल्या व्हिला क्र. १४ या मालमत्तेचा संपूर्ण भाग.

**दि. ०४.०७.२०२४**

**ॲड. सिद्धार्थ जे. सामंत**
ॲडव्होकेट्स व नोटरी
संपर्क क्र. ९४२२४३८९६०, ८७६७४२२९७६
५०३-५०४, ५वा मजला, एडकॉन माईंडस्पेस,
कांपाल ट्रेड सेंटरजवळ,
ताज विवांता समोर, कांपाल, पणजी, तिसवाडी, गोवा-४०३००१.
ईमेल : samantadvocates@yahoo.com

**TRANSFER OF VEHICLE**

I **ANJANI SATISH ANKOLEKAR**, Wife of **SATISH B. ANKOLEKAR, PRIOL GALI, MARDOL, PONDA, SOUTH GOA** would like to transfer the APE CRGO 0600 (WOODS CARRIER) bearing **Reg.No.GA-01-W-5946** on my name. Any person having any claim OR objection in this regards shall intimate to the **RTO, PONDA** within 15 days from the date of publication of the notice.

SD/-
SMT. ANJANI SATISH ANKOLEKAR

**CHANGE OF NAME**

I, **Maria Joaquina Inacia da Costa** residing at: **House No. 1303-E, Monzon, Curtorim, Salcete, Goa, 403709, India** holder of Indian Passport no **P8544565** hereby declare that I have changed my name from Maria Joaquina Inacia Fernandes to Maria Joaquina Inacia da Costa Henceforth my name will be read as under: Given name: **Maria Joaquina Inacia** and surname: **Da Costa**

**IN THE COURT OF THE JOINT MAMLATDAR-III OF TISWADI TALUKA AT PANAJI**

**Case No. JM-III/MUND/DECL/42/2023**

1. Smt. Rosa F. Fernandes, Wife of late Antonio Fernandes Age 78, widow, Housewife. 2.Shri. Aleixo Fernandes, Son of late Antonio Fernandes Age 51 years. Married, Service, R/o H.No.67, Nr. Mala Lake, Fontainhas, Mala, Panaji Goa ... Applicants

V/s

Mr. Jairam B. Neugi (Since Deceased) Through Legal Heirs 1. Shri Nitin S. Neogi Major of age, Married, Indian National. 2. Mrs. Kirti Nitin Neogi W/o Nitin Neogi, Major of age, Indian National R/o. F-2, Valrine Apts, Behind Mapusa Industrial Estate, Dangui Colony Road, Duler, Mapusa Goa, 403507. 3. Mr. Amol P. Navelkar Major of age, Married. 4. Mrs. Nalini A. Navelkar Wife of Mr. Amol Navelkar Major of age, married Both Indian Nationals, Both R/o Usha Smriti, Beccaichi Arradi, Parra, Bardez Goa. 5. Mr. Gaurinanda S. Neogi Major of Age, Married, 6. Mrs. Shweta G. Neogi, Wife of Mr. Gaurinanda S. Neogi Major of Age, Married, Both Indian Nationals, Both R/o 20/S2, Kamat Garden, Near St. Xavier College, Dattawadi, Mapusa Goa 403 507. 7. Mrs. Neela R. Neogi Major of Age, Married, 8. Mr. Ritesh Rajaram Neogi Major of Age, Married, 9. Mrs. Purva R. Neogi, Wife of Mr. Ritesh Neogi, Major of age, Married, All Indian National All R/o Annapurna Niwas. H. NO. 97, Dattawadi Mapusa Goa 403 507. 10. Mr. Manish S. Pokle Major of Age, Married, 11. Mrs. Rakshna M. Pokle, Wife of Mr. Manish S. Pokle Major of age, Married, Both Indian Nationals, Both R/o Dangui Colony, Duler, Mapusa Goa 403 507. 12. Mrs. Chaaya S. Neogi Major of Age, Married 13. Mr. Susheel S. Neogi Major of Age, Married. 14. Mrs. Mitali S. Neogi Major of Age, Married. 15. Mr. Sarang S. Neogi Major of Age, Married 16. Mr. Uskar S. Neogi Major of Age, Married 17. Mrs. Poonam P. Neogi Major of age, All above Indian Nationals R/o Udai Smruti, Above Bhagyoday Hospital Dattawadi, Mapusa Goa 403 507. 18. Mr. Ulhas Z. Neogi, Major of Age, Indian National 19. Mrs. Bharati U. Neogi Wife of Mr. Ulhas Neogi Major of Age, Indian National Both R/o House No.97, Annapurna Niwas, Dattawadi, Mapusa, Bardez Goa 403 507. 24. Mr. Pradip J. Kavlekar, Major of Age, Indian National, 25. Mrs. Vijaya P. Kavlekar, Wife of Mr. Pradip P. Kavlekar, Major of Age, Indian National, Both R/o Anadi Niwas, Nr. Peddem, Sports Complex, Peddem, Mapusa Goa 403 507. ....Respondents

**NO T I C E,**

**Notice under order 5 of Rule 20(1-A) of Civil Procedure Code, 1908**

Whereas the above applicant no. 2 has made an application in this court under section 8-A of the Goa, Daman and Diu Mundkar (Protection from Eviction Act), 1975.

And whereas the notices issued to the Respondent Nos. 3,4,7,8,9 returned unserved with postal endorsement **"Party out of station"** and Respondent Nos. 1,2,5,6,10,11,12 to 19, 24 and 25 are not served through the notices sent.

And whereas the applicant has prayed before this court on 10/5/2024 for substitute service by publication on any Local newspaper as the applicant is not aware of the any other addresses of Respondent Nos. 1,2,3,4,5,6, 7,8,9,10,11,12 to 19, 24 and 25.

Therefore, notice is hereby given under Order 5 of Rule 20 ( 1-A) of Civil Procedure Code, 1908 to appear in this Court in person or by a pleader duly instructed and able to answer all such questions on **6/8/2024 at 10.30 A.M.**

Take notice that in default of your appearance on the date and time mentioned above, the matter will be heard in your absence.

Given under my hand and the seal of this Court on this 27th day of June, 2024.

SEAL

**Sd/- Janavi Kalekar**
Jt. Mamalatdar - III of
Tiswadi Taluka Panaji - Goa

**गोवा सरकार**
**सार्वजनिक बांधकाम खाते**
**विभाग -८ (इमारती-दक्षिण),**
**फातोर्डा-मडगाव, गोवा**

**ई-निविदा सूचना क्र. पीडब्ल्यूडी/डिव्ही.-८(बीएस)/एएसडब्ल्यू/२००१/०७/२०२४-२०२५ दि. ०४.०७.२०२४**

**(फक्त ई-निविदा व ई-भरणा प्रणालीने)**

१. निविदा प्रपत्रे ऑनलाईन सादर करण्याची अंतिम तारीख : **११.०७.२०२४ सकाळी ११.०० पर्यंत.**

२. निविदा ऑनलाईन उघडण्याची तारीख : **१५.०७.२०२४ सकाळी ११.०० नंतर.**

अधिक तपशीलासाठी कार्याकारी अभियंता, काम विभाग-८ (इमारती-दक्षिण), सार्वजनिक बांधकाम खाते, फातोर्डा-मडगाव, गोवा यांच्या कार्यालयाला संपर्क करावा.

संकेतस्थळ : https://eprocure.goa.gov.in/

डीआय/एडीव्हीटी/३५१/२०२४